# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

उत्सवाच्या वेळी रस्त्यावर उभारण्यात येणारे तात्पुरत्या स्वरूपातले मंडप/स्टेज यामुळे रहदारीस अडथळा न होऊ देणे तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रभावीरित्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी निश्चित करण्यात आलेली

# मार्गदर्शक तत्त्वे – २०१५

मा. सर्वोच्च न्यायालयातील न्याय निवाडा
**1994 6 Supreme Court Case 360**

मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १७३/२०१०
मध्ये दिलेले निर्देश

# अनुक्रमाणिका



| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | मार्गदर्शक तत्त्वे | २ |
| ३ | ध्वनी प्रदुषण नियंत्रण व नियमन २००० अन्वये उल्हासनगर महापालिका क्षेत्रात जाहिर करण्यात आलेले शांतता क्षेत्र अधिसूचना २०१२ | ६ |

**मनोहर हिरे**
**आयुक्त**

# प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव व नवरात्रोत्सव, दहीहंडी, रमझान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धार्मिक उत्सव/सण रस्त्यावर साजरे केले जा... उत्सवा दरम्यान मंडप उभारण्यासाठी विविध संस्था मोठया प्रमाणात महापालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महापालिका अधिनियम चे कलम २३४ अन्वये मा. पोलीस आयुक्त यांच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभारण्यासाठी मा. महापालिका आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्यावेळी बहुतेक मंडळेही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावरच मंडप उभारणी करतात अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवामध्ये तात्पुरत्या स्वरूपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये, तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरीक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातून वेळोवेळी उल्हासनगर महानगरपालिकेने मार्गदर्शक तत्त्वे व कार्यालयीन पध्दती तयार केलेली आहे.

डॉ. महेश बेडेकर विरुध्द् महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करतांना रहदारीस अडथळा होणार नाही तसेच ध्वनीक्षेपकामुळे होणारे प्रदूषण नियंत्रित करणे व नागरीकांसाठी तक्रार स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिलेले आहेत व निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत मा. मुख्य सचिवांकडे धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विचारणा केली आहे.

त्या अनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, ध्वनी प्रदूषण होणार नाही, रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही व मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे सार्वजनिक मंडळाकडून उचित पालन होण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजीवन विस्काळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणी नागरीकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था निर्माण केलेली असून सदर सुविधेस उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शन तत्वांमुळे सार्वजनिक उत्सव शांततेत व सुरळीत जनजीवन विस्कळीत न होता साजरे करण्यास निश्चितच मदत होईल असा मला विश्वास आहे.

मनोहर हिरे
आयुक्त

# मार्गदर्शक तत्वे

## अर्ज सादर करण्याची पदध्ती

➢ सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता/सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेशन इ. उभारण्यास परवानगी मिळणेबाबत संबंधित मंडळाने विहित नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

➢ संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी रस्त्याच्या १/४ भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतूकीस उडथळा येणार नाही व नागरीकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही याची दक्षता संबंधित मंडळाने घ्यावयाची आहे. मंडप/स्टेज इ. उभारणेकरिता प्रचलित आकाराचा तक्ता खालीलप्रमाणे:—

| रस्त्याची रूंदी | मंडप/स्टेजसाठी दिली पाहिजे अशी कमाल रूंदी | मोकळी/खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रूंदी |
|---|---|---|
| २५ फुट | ६.२५ फुट | १८.७५ फुट |
| ५० फुट | १२.५ फुट | ३७.५ फुट |
| ७० फुट | १७.५ फुट | ५२.५ फुट |

## ना हरकत दाखला

➢ संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देणेपूर्वी शहर वाहतूक पोलीस शाखा, स्थानिक पोलीस स्टेशन व महापालिकेच्या अग्निशमन विभाग यांचे ना हरकत दाखला तीन दिवसांचे आत सादर करणे आवश्यक आहे.

## पूर्व इतिहास

➢ मागील वर्षी ज्या मंडळांना मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी ज्या जागेवर परवानगी देण्यात आली होती, त्याच जागेवर अर्जाच्या वेळी परवानगी देण्यात येईल. परंतू प्रशासकीय आवश्यकतेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सदर बाबीमध्ये योग्य तो बदल करू शकते.

➢ मागील वर्षी ज्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात आली होती, तेवढयाच आकाराचा किंवा रस्त्याच्या १/४ भाग यापैकी जे कमी असेल त्या आकाराचा मंडप/स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. उल्हासनगर महानगरपालिका आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही याबाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप/स्टेज आकार कमी करण्याचे निर्देशसुध्दा मंडळांना देऊ शकते.

## कायदेशीर तरतूद

- महापालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप/स्टेज इ. उभारणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. उभारल्याचे निदर्शनास आल्यास ते संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीने काढून टाकतील व संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेचं महानगरपालिकेने दिलेल्या सूचनेनुसार म... नसल्यास सदरचा मंडप/स्टेज उल्हासनगर महानगरपालिका पूर्वसूचना न देता काढू श.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही—२०१०/प्र. क्र.१०६/ता.क.३ दि. ०३/०५/२०११ अन्वयें दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.
- महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधित मंडळांनी करणे बंधनकारक आहे.

## दक्षता

- ज्या प्रस्तावित मंडप/स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप/स्टेज इ. उभारणेकरीता किमान १२ फुट रूंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरिता उपलब्ध राहील याची दक्षता घेण्यात यावी.
- संबंधित मंडळाने मंडप/स्टेज इ. यांची उभारणी करतांना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रूंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील जेणेकरून वाहने वळविणे सोपे होईल अशा पध्दतीने कार्यवाही करावी.
- संबंधित मंडळास मंडप/स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणचा सिमेंट कॉंक्रिट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरिता परवानगी देण्यात येणार नाही. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप/स्टेज याकरिता आवश्यक असणारे बांबू रोवून त्यापासून अथवा पूर्वनियोजित व्यवस्थापनाप्रमाणे मंडप/स्टेज याकरिता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते/सार्वजनिक खोदाई करून मंडप/स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मंडळावर रस्ते अनाधिकृतपणे खोदाईबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
- ज्या ठिकाणी पक्या स्वरूपाचे रस्ते दुभाजक आहेत अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यांमधील रस्त्याच्या भागातील १२ फुटांव्यातिरिक्त उर्वरित जागेत मंडपाची उभारणी संबंधित मंडळाने करावी.
- कोणत्याही ठिकाणी ८ फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप/स्टेज इ. उभारणीकरीता परवानगी महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही. मंडप/स्टेज इ. चे अंतर विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा ६ फुट अंतरावर ठेवणे संबंधित मंडळावर बंधनकारक आहे.

- सार्वजनिक उत्सवांकरीता आवश्यक विद्युत कनेक्शन महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधून घेता येणार नाही. असे आढळून आल्यास संबंधित मंडळावर दंडात्मक कारवाई करून त्यांची परवानगी रदद् करण्यात येईल.

- संबंधित मंडळाला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त १५ मीटर अंतरापर्यंतच विद्युत रोषणाई करता येईल.

## शुल्क वसुली

- उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता/सार्वजनिक ठिकाणी उत्सव, सण, कार्यक्रम तसेच वैयक्तिक कारणांसाठी मंडप/स्टेज उभारणेसाठी यापूर्वी मा. महासभेने पारित केलेल्या ठरावाप्रमाणे आवश्यक शुल्काची वसूली संबंधित मंडळाकडून करण्यात येईल.

## परवानगी कालावधी

- सार्वजनिक रस्ते तात्पुरते व्यापण्यासाठी किंवा त्यावर उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांच्याबाबतीत पाच दिवस किंवा सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांच्या बाबतीत पंधरा दिवस हयापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

## ध्वनी प्रदुषण तक्रारींबाबत कार्यपध्दती

- सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तिव्रता औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स), ध्वनीवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनामुळे ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे, ध्वनी प्रदुषणामुळे नागरीकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतूने ध्वनी निर्माण करणाऱ्या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमण) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

- बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी उपकरणे/स्त्रोत जसे D.G. Sets, Generator Sets, इमारतीसाठी वापरण्यात येणाऱ्या संविधा, घरगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हवेतील ध्वनी प्रदूषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असेल.

- आवाजाच्या संबधीत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा

| क्षेत्र यंकेतांक | क्षेत्र/झोन प्रवर्ग | डेबि(ए)एल ईक्यू दिवसा | मधील मर्यादा रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

टीप

१. दिवसा म्हणजे सकाळी ६:०० ते रात्री १०:०० पर्यंत
२. रात्री म्हणजे रात्रौ १०:०० ते सकाळी ६:०० पर्यंत
३. शांतता क्षेत्र म्हणजे रूग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या १०० मीटरपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.
४. संमिश्र क्षेत्र हे वर नमूद केलेल्या चारांपैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिक. घोषित करण्यात येईल

➢ ध्वनी प्रदूषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवहीची व्यवस्था केलेली आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदूषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस स्टेशनला व पोलीस कंट्रोल रूमला अग्रेषीत करण्यात येणार आहे.

➢ शांतता क्षेत्र जाहीर करणे:

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना शांतता क्षेत्र अधिसूचना क्रमांक उमपा/पर्यावरण/०५/दिनांक १६ एप्रिल २०१२.

❖ तक्रार निवारण व्यवस्था:

➢ मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनाधिकृतरित्या उभारलेल्या मंडपांबाबत तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत, नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली आपत्कालिन विभागाची टोल फ्री नंबर, ई–मेल सुविधा, एस.एम.एस. सुविधा खालीलप्रमाणे उपलब्ध केलेली आहे व त्यास उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

टोल फ्री नंबर: १८००२३३११०१

ई–मेल: cfc umc@umc.gov.in

**Complaint portal:** www. umc.gov.in

➢ वरिलप्रमाणे आदेश आपत्कालीन विभागाला दिलेले असून सर्व सहाय्यक आयुक्त, सर्व विभाग प्रमुख, सर्व उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत केलेले आहेत.

➢ ध्वनी प्रदूषण तसेच इतर प्रदूषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील.

➢ पोलीस, वाहतूक यंत्रणा, शासन यंत्रणा यांना दिलेले सर्व निर्देश यांचे काटेकोर पालन करणे मंडळास बंधनकारक राहील.

---

// सत्यमेव जयते //

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ४, अंक ५] सोमवार, एप्रिल १६, २०१२/चैत्र २७, शके १९३४ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ३२

प्राधिकृत प्रकाशन

## उल्हासनगर महानगरपालिका

### पर्यावरण विभाग

### "शांतता क्षेत्र" अधिसूचना

क्रमांक उमपा/पर्यावरण/५

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० या नियमा अंतर्गत २६ फेब्रुवारी २००९ च्या अंतरिम निर्णयान्वये "शांतता क्षेत्र" जाहीर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ध्वनी प्रदूषण वाढती पातळी व निरनिराळे प्रदूषण स्त्रोत विचारात घेता पर्यावरण मंत्रालय व वनविभाग, यांच्या १४ फेब्रुवारी २००० चे निर्णयनुसार कोर्ट, शाळा व हॉस्पीटल यांचे १०० मीटर परिसरात "शांतता क्षेत्र" निर्देशित करता येते याबाबत पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार मी श्री. अशोककुमार रणखांब आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर मा. उच्च न्यायालय, मुंबई व पर्यावरण मंत्रालय व वनविभाग, केंद्र सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे पदनाम प्राधिकारी म्हणून आम जनतेच्या स्वास्थ्यासाठी व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी खालीलप्रमाणे "शांतता क्षेत्र" म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती १ मधील खालीलप्रमाणे शाळा, महाविद्यालय प्राधान्याने "शांतता क्षेत्र" म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| प्रभाग क्र. (१) | शाळा, महाविद्यालयांचे नाव व ठिकाण (२) |
|---|---|
| १ | सेच्युरी विद्यालय, उल्हासनगर-१ |
| १ | सेच्युरी हॉस्पीटल, उल्हासनगर-१ |
| १ | सेच्युरी गेस्ट हाऊस, उल्हासनगर-१ |
| १ | प्रिती ॲकेडमी इंग्लीश स्कूल मुरबाड नाका, उल्हासनगर-१ |
| १ | स्वामी विवेकानंद इंग्लीश शाळा, धोबी घाट, उल्हासनगर-१ |
| १ | कमला नेहरू नगर, उल्हासनगर-१ |

| (१) | (२) |
|---|---|
| ५ | डॉ. झाकिर हुसेन उर्दू स्कूल, गुलशन नगर, उल्हासनगर-१ |
| ५ | आनंद हिंदी विद्यालय, महात्मा फुले चौक, उल्हासनगर-१ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिंदी विद्यालय, उल्हासनगर-१ |
| ६ | व्ही. पी. नाईक कॉलनी, उल्हासनगर-१ |
| ६ | टी. एम. टी. हिंदी शाळा, ए ब्लॉक रोड, उल्हासनगर-१ |
| ७ | मिडल अर्जन विद्यालय, उल्हासनगर महानगरपालिका मार्ग, उल्हासनगर-३ |
| १४ | जयहिंद स्कूल जुनी शाळा, सेवा निकेतन हॉस्पीटल समोर, उल्हासनगर-३ |
| १४ | सेवा निकेतन हॉस्पीटल, उल्हासनगर-३ |
| १५ | डी. टी. कॉलनी कॉलेज, उल्हासनगर-१ |
| १६ | स्वामी विवेकानंद इंग्लीश शाळा आनंद मेश्यु नगर, उल्हासनगर-१ |
| १९ | साधुबेला स्कूल आणि कॉलेज, उल्हासनगर-१ |
| १९ | साधु बेला शाळेजवळ, समोर सेंट्रल हॉस्पीटल, उल्हासनगर-१ |
| २५ | शारदा गुजराथी स्कूल, हिरा मॅरेज हॉल जवळ, उल्हासनगर-२ |

वरील नमूद ठिकाणी "शांतता क्षेत्र" असे लिहिलेले फलक लावण्यात यावेत व त्या फलकाच्या दरम्यान १०० मीटरचा परिसर हा "शांतता क्षेत्र" म्हणून समजण्यात येईल, सर्व नागरिकांना व वाहनचालकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, वर नमूद "शांतता क्षेत्र" मध्ये वाहनांचा हॉर्नचा, लाऊड स्पिकरचा, वाद्यांचा किंवा इतर कोणत्याही प्रकारे दिवसा (सकाळी ६-०० ते रात्री १०-०० वाजेपर्यंत) ५० डेसिबल व (रात्री १०-०० ते सकाळी ६-०० वाजेपर्यंत) ४० डेसिबल पेक्षा जास्त आवाज करणार नाहीत.

सदर आदेशाचा भंग केल्यास त्यांच्यावर पर्यावरण सुरक्षा कायदा, १९८६ आणि ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम २००० च्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदर कायद्यानुसार आरोपीस ५ वर्षापर्यंत कैद किंवा रु. १,००,००० (रुपये एक लाख) पर्यंत दंड किंवा दोन्ही अशा प्रकारची शिक्षा कायद्यात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदरची "शांतता क्षेत्र अधिसूचना" दिनांक १ मे २०१२ पासून अंमलात येईल. तसेच सदर अधिसूचना ही पोलीस वाहने फायरब्रिगेड, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

उल्हासनगर, दिनांक १२ एप्रिल २०१२.

**अशोककुमार रणखांब,**
आयुक्त तथा पदनाम अधिकारी,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर.

## उल्हासनगर महानगरपालिका

### पर्यावरण विभाग

क्रमांक उमपा/पर्यावरण/५

" शांतता क्षेत्र " अधिसूचना

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० या नियमाअंतर्गत दिनांक २६ फेब्रुवारी २००९ च्या अंतरिम निर्णयान्वये " शांतता क्षेत्र " जाहीर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ध्वनी प्रदूषण वाढती पातळी व निरनिराळे प्रदूषण स्त्रोत विचारात घेता पर्यावरण मंत्रालय व वन विभाग, यांच्या दिनांक १४ फेब्रुवारी २००० चे निर्णयानुसार कोर्ट, शाळा व हॉस्पीटल यांचे १०० मीटर परिसरात " शांतता क्षेत्र " निद.. येते, याबाबत पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार मी श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, मा. उच्च न्यायालय, मुंबई व पर्यावरण मंत्रालय व वन विभाग, केंद्र सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे पदनाम प्राधिकारी म्हणून आम जनतेच्या स्वास्थासाठी व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी खालीलप्रमाणे " शांतता क्षेत्र " म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

प्रभाग समिती क्रमांक २ कार्यक्षेत्रांअंतर्गत असलेल्या शाळा, महाविद्यालयांची तसेच दवाखान्यांची वॉर्ड निहाय यादी :---

| अनु. क्र. (१) | प्रभाग क्र. (२) | शाळा, महाविद्यालयांचे नाव व ठिकाण (३) |
|---|---|---|
| १ | १३ | बालवाड्या एकूण २, शांतीनगर, उल्हासनगर-३ |
| २ | २२ | शासन संचलित शाळा -१, आवत चौक, बालवाड्या २ |
| ३ | २६ | आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर-३ |
| ४ | २६ | शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालय, नवजिवन बँकेसमोर, उल्हासनगर-३. |
| ५ | २६ | न्यु ईरा हायस्कुल, उल्हासनगर-३ |
| ६ | ३० | उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. ७, ढोली नास्तेवाल्या समोर, उल्हासनगर-३ |
| ७ | ३२ | मनपा शासकिय शाळा ४, सुभाष नगर, उल्हासनगर-३.<br>खाजगी संचलीत शाळा, फॉलवर लाईन, उल्हासनगर-३. |
| ८ | ३५ | झुलेलाल सिंधी प्राथमिक शाळा - १, खाजगी अनुदानीत शाळा-१ |
| ९ | ४० | मनपा शाळा मराठी माध्यम , खाजगी अनुदानीत शाळा, गरीब नगर, उल्हासनगर-२. |
| १० | ४० | शारदा विद्यालय, महात्मा गांधी नगर, उल्हासनगर-३ |
| ११ | ४३ | माता रमाबाई आंबेडकर विद्यालय, सम्राट अशोक नगर, उल्हासनगर-३ |
| १२ | ४५ | गुरू गोविंदसिंग शाळा, अनिल अशोक सिनेमागृहाजवळ, उल्हासनगर-३ |
| १३ | ४५ | साई बाबा ट्रस्ट हिंदी, इंग्रजी मतीमंद शाळा, जसलोक शाळेसमोर, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर-३. |
| १४ | ४५ | जसलोक विद्यालयासमोर, ओ. टी. सेक्शंन, उल्हासनगर-३. |
| १५ | ४५ | सी. एच. एम महाविद्यालय, उल्हासनगर स्टेशन रोड, उल्हासनगर-३.<br>आय. टी. आय. कॉलेज, शाखा सी. एच. एम कॉलेज<br>फारमशी कॉलेज, शाखा सी. एच. एम कॉलेज<br>आर. एच. हीरानंदानी कॉलेज, शाखा सी. एच. एम कॉलेज<br>लॉ कॉलेज, शाखा सी. एच. एम. कॉलेज<br>एमं. बी. ए, शाखा- सी. एच. एम. कॉलेज |
| १६ | ४६ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. २५, संतु बिल्डींग जवळील चौक, उल्हासनगर-३. |
| १७ | ५४ | खाजगी अनुदानित शाळा, रेणूका सोसायटी, उल्हासनगर-३. |

| अनु. क्र. (१) | प्रभाग क्र. (२) | दवाखान्यांचे नाव व ठिकाण (३) |
|---|---|---|
| १ | १३ | उल्हासनगर महानगरपालिका शासकिय दवाखाना, मुख्यालयाच्या पाठीमागे, उल्हासनगर-३. |
| २ | २३ | शासकिय आरोग्य केंद्र, नेहरू चौक रोड, उल्हासनगर-२ |
| ३ | ३२ | रेड क्रॉस रूग्णालय, टाऊन हॉल रोड, उल्हासनगर-३. |
| ४ | ३३ | (१) मध्यवर्ती रूग्णालय, उल्हासनगर-३.<br>(२) राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, उल्हासनगर-३. |

वरील नमूद ठिकाणी "शांतता क्षेत्र" असे लिहिलेले फलक लावण्यात यावेत व त्या फलकाच्या दरम्यान १०० परिसर हा "शांतता क्षेत्र" म्हणून समजण्यात येईल, सर्व नागरिकांना व वाहनचालकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, वर नमूद "शांतता क्षेत्र" मध्ये वाहनांचा हॉर्नचा, लाऊड स्पिकरचा, वादयांचा किंवा इतर कोण्त्याही प्रकारे दिवसा (सकाळी ६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत) ५० डेसिबल व (रात्री १०:०० ते सकाळी ६:०० वाजेपर्यंत) ४० डेसिबल पेक्षा जास्त आवाज करणार नाहीत.

सदर आदेशाचा भंग केल्यास त्यांच्यावर पर्यावरण सुरक्षा कायदा, १९८६ आणि ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० च्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदर कायदयानुसार आरोपीस ५ वर्षांपर्यंत कैद किंवा रु. १,००,००० (रूपये एक लाख) पर्यंत दंड किंवा दोन्ही अशा प्रकारची शिक्षा कायदयात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदरची "शांतता क्षेत्र अधिसूचना" दिनांक १ नोव्हेंबर, २०११ पासून अंमलात येईल.तसेच सदर अधिसूचना ही पोलिस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

उल्हासनगर, दिनांक १२ एप्रिल २०१२.

**अशोककुमार रणखांब,**
आयुक्त तथा पदनाम अधिकारी,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर.

# उल्हासनगर महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

क्र. उमपा/पर्यावरण/५

### “ शांतता क्षेत्र ” अधिसूचना

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० या नियमा अंतर्गत २६ फेब्रुवारी २००९ च्या अंतरिम निर्णयान्वये “शांतता क्षेत्र” जाहीर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ध्वनी प्रदूषण वाढती पातळी व निरनिराळे प्रदूषण स्त्रोत विचारात घेता पर्यावरण मंत्रालय व वनविभाग यांच्या १४ फेब्रुवारी २००० चे निर्णयानुसार कोर्ट, शाळा व हॉस्पीटल यांचे १०० मिटर परिसरात “शांतता क्षेत्र” निर्देशित करता येते, ५. पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार मी, श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, मा. उच्च न्यायालय, मुंबई व पर्यावरण मंत्रालय व वनविभाग, केंद्र सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे पदनाम प्राधिकारी म्हणून आम जनतेच्या स्वास्थासाठी व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी खालीलप्रमाणे “शांतता क्षेत्र” म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ३ मधील खालीलप्रमाणे शाळा, महाविद्यालय प्राधान्याने “शांतता क्षेत्र” म्हणून जाहिर करण्यात येत आहेत :—

| प्रभाग क्र. (१) | शाळा, महाविद्यालयांचे नाव व ठिकाण (२) |
|---|---|
| ७ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा नं. १७/२१, सी.ब्लॉक रोड, उल्हासनगर-३. |
| ९ | डॉ. गावडे विद्यालय, शांतीनगर रेमण्ड शोरूम मागे, उल्हासनगर-३. |
| १० | प्रशांत एज्युकेशन सोसायटी, विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन, उल्हासनगर-३. |
| १३ | जयहिंद ॲकेडमी (न्यु), चोपडा कोर्ट समोर, उल्हासनगर-३. |
| २५ | जयहिंद ॲकेडमी (ओल्ड), चोपडा कोर्ट समोर, उल्हासनगर-३. |
| २९ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा नं. ९/२१, पवई चौक, उल्हासनगर. |
| ४८ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा नं. १३/१४, ओटी सेक्शन, उल्हासनगर-४. |
| ४८ | एन.सी.टी शाळा, विठ्ठलवाडी पोलीस लाईन, उल्हासनगर-४. |
| ४९ | यशवंत विद्यालय, व्हि.टी.सी क्रीडा संकुल मागे, उल्हासनगर-४. |
| ५१ | उल्हास विद्यालय, सेक्शन-३२, उल्हासनगर-४. |
| ५१ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा नं. ११, मेरा घर अपार्टमेंटजवळ, जुना पंजाब नॅशनल बॅंक, उल्हासनगर-४. |
| ५१ | गंगाराम सिंध नॅशनल हाईस्कूल, मराठी सेक्शन-३२, उल्हासनगर-४. |
| ५८ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा नं. १०, सतरामदास हॉस्पीटलसमोर, उल्हासनगर-४. |
| ५९ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा नं. १२, सेक्शन २५, उल्हासनगर-४. |
| ५९ | नूतन मराठी विद्यालय, सेक्शन २५, उल्हासनगर-४. |

वरील नमूद ठिकाणी “शांतता क्षेत्र” असे लिहिलेले फलक लावण्यात यावेत व त्या फलकाच्या दरम्यान १०० मीटरचा परिसर हा “शांतता क्षेत्र” म्हणून समजण्यात येईल, सर्व नागरिकांना व वाहनचालकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, वर नमूद “शांतता क्षेत्र” मध्ये वाहनांच्या हॉर्नचा, लाऊड स्पिकरचा, वाद्यांचा किंवा इतर कोणत्याही प्रकारे दिवसा (सकाळी ६-०० ते रात्री १०-०० वाजेपर्यंत) ५० डेसिबल व (रात्री १०-०० ते सकाळी ६-०० वाजेपर्यंत) ४० डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणार नाहीत.

सदर आदेशाचा भंग केल्यास त्यांच्यावर पर्यावरण सुरक्षा कायदा, १९८६ आणि ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० च्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदर कायद्यानुसार आरोपीस ५ वर्षांपर्यंत कैद किंवा रु. १,००,००० (रुपये एक लाख) पर्यंत दंड किंवा दोन्ही अशा प्रकारची शिक्षा कायद्यात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदरची "शांतता क्षेत्र अधिसूचना" दिनांक १ मे २०१२ पासून अंमलात येईल. तसेच सदर अधिसूचना ही पोलीस फायरब्रिगेड, रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

उल्हासनगर, दि. १२ एप्रिल २०१२.

**अशोककुमार रणखांब,**
आयुक्त तथा पदनाम अधिकारी,
उल्हासनगर महानगरपा..
उल्हासनगर.

## उल्हासनगर महानगरपालिका

### पर्यावरण विभाग

क्र. उमपा/पर्यावरण/५

### "शांतता क्षेत्र" अधिसूचना.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० या नियमा अंतर्गत २६ फेब्रुवारी २००९ च्या अंतरिम निर्णयान्वये "शांतता क्षेत्र" जाहीर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ध्वनी प्रदूषण वाढती पातळी व निरनिराळे प्रदूषण स्त्रोत विचारात घेता पर्यावरण मंत्रालय व वनविभ. १४ फेब्रुवारी २००० च्या निर्णयानुसार कोर्ट, शाळा व हॉस्पिटल यांचे १०० मीटर परिसरात "शांतता क्षेत्र" निर्देशित करता याबाबत पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार मी, श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर मा. उच्च न्यायालय, मुंबई व पर्यावरण मंत्रालय व वनविभाग, केंद्र सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे पदनाम प्राधिकारी म्हणून आम जनतेच्या स्वास्थासाठी व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी खालीलप्रमाणे "शांतता क्षेत्र" म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ३ मधील खालीलप्रमाणे रुग्णालये प्राधान्याने "शांतता क्षेत्र" म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| प्रभाग क्र. (१) | रुग्णालयाचे नाव व ठिकाण (२) |
|---|---|
| ७ | डॉ. शुक्ला, गणेश हॉस्पिटल, गवळीपाडा, शहाड रोड, सी.ब्लॉक, उल्हासनगर-३. |
| ७ | डॉ. अशोक इंदीरानगर, सी ब्लॉक रोड, गुरूद्वारा समोर, उल्हासनगर-३. |
| ९ | डॉ. संभाजी गर्जे राजाभाऊ यांच्या घराजवळ, शांतीनगर, उल्हासनगर-३. |
| ९ | मिरा हॉस्पिटल, सेंट्रलपार्क हॉटेल, २ रा माळा, कल्याण अंबरनाथ रोड, उल्हासनगर-३. |
| १० | डॉ. डोके गोपाल समाज मंदीराजवळ, विठ्ठलवाडी,उल्हासनगर-३. |
| १० | डॉ. नाथानी बारकु म्हात्रे यांच्या घराजवळ, विठ्ठलवाडी, उल्हासनगर-३. |
| ११ | डॉ. श्री. प्रकाश महाजन, शिवसेना शाखेजवळ, शांतीनगर, उल्हासनगर-३. |
| ११ | डॉ. श्रीमती. सुंदरानी, श्रीराम जनरल हॉस्पिटल, केणी अपार्टमेंट, व्ही. जे होंडा शोरूम, उल्हासनगर-३. |
| ११ | डॉ. इसाहर हुसेन, गारूडीपाड़ा, शांतीनगर, उल्हासनगर-३. |
| १२ | डॉ. कमलेश शर्मा, बुध्दविहार समोर, कौशल्यानगर, उल्हासनगर-३. |
| १२ | डॉ. ब्रिजवाणी, साईबाबानगर, श्री. लांडे यांचे रेशन दुकानाजवळ, उल्हासनगर-३. |
| १२ | डॉ. गुप्ता, साईबाबानगर, श्री. लांडे यांचे रेशन दुकानाजवळ, उल्हासनगर-३. |
| १२ | डॉ. दाभाडे, दाभाडे चौक, मोहटा देवी मंदीराजवळ, उल्हासनगर-३. |
| १२ | उल्हासनगर महानगरपालिका डिस्पेनसरी, नागरी आरोग्य केंद्र, मोहटा देवी मंदीर रोड, उल्हासनगर-३. |
| ४८ | रतन हॉस्पिटल, श्रीराम चौक, उल्हासनगर-३. |
| ४८ | साई प्रसाद हॉस्पिटल, श्रीराम पेट्रोल पंप समोर, उल्हासनगर-३. |
| ४८ | मातोश्री हॉस्पिटल, श्रीराम चौक, उल्हासनगर-३. |
| ४८ | अंकुर हॉस्पिटल, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन समोर, उल्हासनगर-४. |
| ५१ | शासकीय प्रसुतिगृह, बाजारपेठ, उल्हासनगर-४. |
| ५१ | आशिर्वाद हॉस्पिटल, मराठा सेंक्शन-३२, उल्हासनगर-४. |
| ५२ | गिरिजा नर्सिंग होम, उल्हासनगर स्टेशन रोड, लालचक्की, उल्हासनगर-३. |

| (१) | (२) |
|---|---|
| ५३ | साई हॉस्पिटल, उल्हासनगर स्टेशन रोड, उल्हासनगर-४. |
| ५७ | मानस नर्सिंग होम बगाडे डेकोरेटर्स समोर, उल्हासनगर-४. |
| ५८ | श्री. अशोक मॅटेरनिटी होम शाळा नं. १० समोर, सतरामदास हॉस्पिटल, उल्हासनगर-४. |
| ५९ | महावीर हॉस्पिटल, सेक्शन २५, उल्हासनगर-३. |

वरील नमूद ठिकाणी "शांतता क्षेत्र" असे लिहिलेले फलक लावण्यात यावेत व त्या फलकाच्या दरम्यान १०० मीटरचा परिसर हा "शांतता क्षेत्र" म्हणून समजण्यात येईल; सर्व नागरिकांना व वाहनचालकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, वर नमूद "शांतता क्षेत्र" मध्ये वाहनांचा हॉर्नचा, लाऊड स्पिकरचा, वाद्यांचा किंवा इतर कोणत्याही प्रकारे दिवसा ( [illegible] ० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत) ५० डेसिबल व (रात्री १०:०० ते सकाळी ६:०० वाजेपर्यंत) ४० डेसिबल पेक्षा जास्त आवाज करणार नाहीत.

सदर आदेशाचा भंग केल्यास त्यांच्यावर पर्यावरण सुरक्षा कयदा १९८६ आणि ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम २००० च्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.सदर कायदयानुसार आरोपीस ५ वर्षापर्यंत कैद किंवा रू. १,००,००० (रूपये एक लाख) पर्यंत दंड किंवा दोन्ही अशा प्रकारची शिक्षा कायद्यात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदरची "शांतता क्षेत्र अधिसूचना" दिनांक १ मे २०१२ पासून अंमलात येईल.तसेच सदर अधिसूचना ही पोलिस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

उल्हासनगर, दिनांक १२ एप्रिल २०१२.

**अशोककुमार रणखांब,**
आयुक्त तथा पदनाम अधिकारी,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर.

## उल्हासनगर महानगरपालिका

### पर्यावरण विभाग

क्र. उमपा/पर्यावरण/५

### " शांतता क्षेत्र " अधिसूचना.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, २००० या नियमा अंतर्गत २६ फेब्रुवारी २००९ च्या अंतरिम निर्णयान्वये "शांतता क्षेत्र" जाहीर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ध्वनी प्रदूषण वाढती पातळी व निरनिराळे प्रदूषण स्त्रोत विचारात घेता पर्यावरण मंत्रालय व वन विभाग, यांच्या १४ फेब्रुवारी २००० चे निर्णयानुसार कोर्ट, शाळा व हॉस्पीटल यांचे १०० मिटर परिसरात "शांतता क्षेत्र" निर्देशित करणे. याबाबत पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार मी, श्री. अशोककुमार रणखांब, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, मा. उच्च न्यायालय, मुंबई व पर्यावरण मंत्रालय व वन विभाग, केंद्र सरकार यांच्या निर्देशाप्रमाणे पदनाम प्राधिकारी म्हणून आम जनतेच्या स्वास्थासाठी व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी खालीलप्रमाणे "शांतता क्षेत्र" म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ४ मधील खालीलप्रमाणे शाळा, महाविद्यालय व रुग्णालय प्राधान्याने "शांतता क्षेत्र" म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| प्रभाग क्र. | शाळा, महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | पत्ता |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| ५५ | ज्ञानदिप शाळा | डॉ. आंबेडकर चौक, उल्हासनगर ४ |
| ५७ | बुकाणे हॉस्पीटल | व्हिनस सिनेमा मागे, उल्हासनगर ४ |
| ६० | ज्ञानदा विद्यामंदीर | रामरक्षा हॉस्पीटलचे शेजारी, उल्हासनगर ५. |
| ६० | रामरक्षा हॉस्पीटल | बंगला एरिया ६०४ चे शेजारी, उल्हासनगर ५ |
| ६१ | संजीवनी हॉस्पीटल | देव समाज रोड, उल्हासनगर ५ |
| ६१ | आर.के.अंभग हायस्कूल | देव समाज रोड, उल्हासनगर ५ |
| ६१ | हॅपीहोम स्कूल | संभाजी चौक, उल्हासनगर ५ |
| ६२ | धनवंतरी हॉस्पीटल | लालचक्की, उल्हासनगर ४ |
| ६२ | तक्षशिला विद्यालय | सुभाष टेकडी, उल्हासनगर ४ |
| ६२ | नालंदा प्राथमिक शाळा | दहा चाळ, उल्हासनगर ४ |
| ६४ | छत्रपती शिवाजी प्राथमिक शाळा | हनुमान मंदीर, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर ५ |
| ६४ | तक्षशिला विद्यालय | विक्रमशिला कॉलनी, उल्हासनगर ५ |
| ६४ | सट्रीफाईड शाळा | विक्रमशिला कॉलनी, उल्हासनगर ५ |
| ६४ | गुरूनानक हायस्कूल, ज्युनियर कॉलेज | कुर्ला कॅम्प, उल्हासनगर ४ |
| ६४ | विकास मतीमंद विद्यालय | कुर्ला कॅम्प, उल्हासनगर ४ |
| ६५ | श्री हॉस्पीटल | कालीमाता चौक बाजुला, उल्हासनगर ५ |
| ६५ | निलकंठ हिंदी विद्यालय | समता नगर नं. २, उल्हासनगर ५ |
| ६६ | भाटीया ए. बी. दवाखाना | भाटीया हॉस्पीटल रोड, उल्हासनगर ५ |
| ६७ | प्रभात जन. दवाखाना | सुख सागर हॉटेल, नेताजी चौकजवळ, उल्हासनगर ५ |
| ६८ | स्वामी हंसमुनी डीग्री कॉलेज | नेताजी शाळेमागे, उल्हासनगर ५ |
| ६८ | नेताजी हायस्कूल | नेताजी चौक, उल्हासनगर ५ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ६८ | न्यू इंग्लीश हायस्कूल ॲन्ड ज्युनियर कॉलेज. | नेताजी चौक, उल्हासनगर ५ |
| ६९ | चालिया हॉस्पीटल | चालीया मंदिरासमोर, उल्हासनगर ५ |
| ६९ | उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. १४ | मच्छी मार्केट, उल्हासनगर ५ |
| ६९ | सिंधी शाळा | चालीया मंदीरासमोर, उल्हासनगर ५ |
| ६९ | हिंदी शाळा | शोभराज गार्डन जवळ, उल्हासनगर ५ |
| ७० | सर्वानंद हॉस्पीटल | जुने बसस्टॉप, उल्हासनगर ५ |
| ७० | उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. ५ व १६. | जुने बसस्टॉप, उल्हासनगर ५ |
| ७० | स्वस्तीक हॉस्पीटल | कुर्ला कॅम्प चौक, माता मंदीर, उल्हासनगर ५ |
| ७१ | सुशिल सिन्हा हायस्कूल | कैलाश कॉलनी, बसस्टॉप जवळ, उल्हासनगर ५ |
| ७१ | दुनिचंद कालानी प्राथमिक हायस्कूल | रविंद्र नगर कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर ५ |
| ७३ | स्वामी शांती प्रकाश शाळा | बसंत बहार रोड, उल्हानगर ५ |
| ७४ | सवित्रीबाई फुले शाळा | जुनी खडी मशिन, आकाश कॉलनी, उल्हासनगर ५ |
| ७६ | ज्ञान अमृत शाळा | गायकवाड पाडा, दुर्गापाडा, उल्हासनगर ५ |
| ७६ | जागृत शाळा | गायकवाड पाडा, उल्हासनगर ५ |
| ७६ | रामकृष्ण हरि विद्या मंदिर | गायकवाड पाडा, उल्हासनगर ५ |

वरील नमूद ठिकाणी "शांतता क्षेत्र" असे लिहिलेले फलक लावण्यात यावेत व त्या फलकाच्या दरम्यान १०० मिटरचा परिसर हा "शांतता क्षेत्र" म्हणून समजण्यात येईल, सर्व नागरिकांना व वाहनचालकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, वर नमूद "शांतता क्षेत्र" मध्ये वाहनांचा हॉर्नचा, लाऊड स्पिकरचा, वाद्यांचा किंवा इतर कोणत्याही प्रकारे दिवसा (सकाळी ६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत) ५० डेसिबल व (रात्री १०:०० ते सकाळी ६:०० वाजेपर्यंत) ४० डेसिबल पेक्षा जास्त आवाज करणार नाहीत.

सदर आदेशाचा भंग केल्यास त्यांच्यावर पर्यावरण सुरक्षा कायदा, १९८६ आणि ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम २००० च्या तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सदर कायद्यानुसार आरोपीस ५ वर्षापर्यंत कैद किंवा रु. १,००,००० (रुपये एक लाख) पर्यंत दंड किंवा दोन्ही अशा प्रकारची शिक्षा कायद्यात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदरची "शांतता क्षेत्र अधिसूचना" दिनांक १ मे २०१२ पासून अंमलात येईल. तसेच सदर अधिसूचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

उल्हासनगर, दि. १२ एप्रिल २०१२.

**अशोककुमार रणखांब,**
आयुक्त तथा पदनाम अधिकारी,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.